


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

dainiklokaarambh@gmail.com

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २७ डिसेंबर २०२४ | अंक१८● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

## भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचं निधन, दिल्लीच्या एम्स रुग्णालयात अखेरचा श्वास

सरत्या वर्षाच्या अखेरच्या आठवड्यात कोट्यवधी देशवासीयांच्या मनाला चटका देणारी बातमी समोर आली आहे. भारताचे माजी पंतप्रधान, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.
मनमोहन सिंह यांचं निधन झालं आहे. मनमोहन सिंह यांनी वयाच्या ९२ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांची आज अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांना श्वसनास त्रास होत होता. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. यावेळी एम्स रुग्णालयात दिग्गज डॉक्टरांच्या टीमने त्यांच्यावर उपचार केले. यावेळी मनमोहन सिंह यांच्या
फुफ्फुसांमध्ये इन्फेक्शन झाल्याची माहिती समोर आली. डॉक्टरांनी लगेच मनमोहन सिंह यांच्यावर उपचार सुरु केले. त्यांना ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आलं. पण त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती तेव्हाच समोर आली होती. यानंतर काँग्रेसच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी आणि खासदार प्रियंका गांधी या एम्स रुग्णालयात दाखल झाल्याची माहिती समोर



आली. यानंतर आता मनमोहन सिंह यांचं निधन झाल्याची दुर्दैवी बातमी समोर आली आहे.मनमोहन सिंह यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी पंजाबच्या गाह (सध्याच्या पाकिस्तानातील पंजाब) येथे झाला होता. ते देशाचे १४ वे पंतप्रधान होते. मनमोहन सिंह हे अर्थशास्त्रात उच्चशिक्षित आहेत. त्यांनी पंजाब विद्यापीठ, केम्ब्रिज विद्यापीठ आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ सारख्या नामांकीत विद्यापीठांमधून शिक्षण घेतलं आहे. त्यांनी १९५७ ते १९६५ या काळात पंजाब विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केलं आहे.मनमोहन सिंह १९६९-७१ या काळात दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत आंतरराष्ट्रीय व्यापार विषयाचे प्राध्यापक होते. त्यानंतर १९७६ मध्ये ते दिल्लीमधील जवाहरलाल नेहरू विद्यापिठात मानद प्राध्यापक म्हणून रुजू झाले. विशेष म्हणजे १९८२ ते १०८५ या काळात भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते. तर १९८५-८७ या काळात भारताच्या योजना आयोगाचे उपाध्यक्ष होते. तसेच १९९० ते १९९१ या काळात पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार होते. यानंतर १९९१ मध्ये ते केंद्र सरकारमध्ये अर्थमंत्री होते.
पतप्रधान मोदींकडून फोनवरुन सिंह यांच्या कुटुंबियांची विचारपूसपंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनमोहन सिंह यांच्या कुटुंबियांना फोन करुन विचारपूस केल्याची माहिती समोर आली आहे. तर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा हे एम्स रुग्णालयात दाखल झाले आहेत. तसेच अनेक दिग्गज नेते एम्स रुग्णालयात दाखल होत आहे. पोलिसांकडून आता दिल्लीतील एम्स रुग्णालयाचा परिसर
मोकळा करण्याचं काम सुरु झालं आहे.
काँग्रेसची बेळगावमधील सभा रद्द, राहुल गांधी दिल्लीच्या दिशेला रवाना काँग्रेसची उद्या बेळगावात मोठी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेसाठी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि खासदार राहुल गांधी हे बेळगावात गेले होते. पण मनमोहन सिंह यांचं निधन झाल्याची माहिती समोर आल्यानंतर ते दिल्लीच्या दिशेला रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.

## क्रांतिकारी शिक्षक संघटना जिल्हा बीडची कार्यकारणी जाहीर



दि: २४/१२/२०२४ रोजी संघटनेच्या मुख्य कार्यलय बशीर गंज येथे बैठक संपन्न झाली या बैठकीत जिल्हा परिषद शाळा शाखेच्या जिल्हा अध्यक्ष पदी जि .पब.चे शिक्षक श्री. सतीश पवार सर, जिल्हा सचिव पदी श्री. राजू सर,तसेंच बीडच्या शहर अध्यक्ष पदी श्री. भरत काबले सर, शहर सचिव पदी श्री. शेख फतेहुल मुबीन सर यांची निवड करण्यात आली. यावेळी संघटनेचे संस्थापक सचिव श्री शहीद कादरी सर, जिल्हा अध्यक्ष श्री. आसरार खान सर, जिल्हा सचिव प्रा.डॉ. शशिकांत गायकवाड सर, तसेच सर्व कार्यकर्ते व सहकारी यांनी अभिनंदन केले....

## साने गुरुजी यांची जयंती साजरी



चकलांबा प्रतिनिधी :- गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील जि. प. मा शाळा व जि प कें शाळा या दोन्ही शाळेच्या वतीने येथे साने गुरुजी प्रतिमेला पुष्पहार घालून १२५ वी जयंती साजरी करण्यात आली. तसेच साने गुरुजी यांच्या जीवनावर व त्यांच्या कार्याविषयी माहिती सांगण्यात आले. तसेच काही विद्यार्थीने भाषण केले यावेळी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा शाळेचे मुख्याध्यापक गर्कळ सर , बांगर सर ,भारती सर,मेटकर सर ,खुडे सर ,तोतरे सर,डोंगरे सर,मरकड सर ,दहिफळे मॅडम,राऊत सर ,कोकणे सर ,शेळके सर ,आमटे सर ,बडे सर,सारुक मॅडम,आहेर सर,खेडकर सर ,पाचर्णे सर,आंधळे सर ,गर्कळ सर,सोनवणे मॅडम ,जाधव सर,राठोड सर , राठोड मॅडम , उघडे सर, घाडगे सर ,राठोड सर, गवांदे सर, गवई सर,शेख सर घाडगे सर , खेडकर सर,राख सर, गिरी सर आदी उपस्थित होते

## स्वर्गीय संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी लाखो लोक रस्त्यावर उतरणार.-गणेश वरेकर



बीड प्रतिनिधी मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुखांची हत्या होऊन पंधरा दिवस उलटले.नवीन एसपी बीडमध्ये दाखल झाले. हत्येचा तपास सीआयडी कडे गेला. मुख्यमंत्र्यांनी न्यायाची हमी दिली परंतु अद्याप आरोपी अटक नाहीत. मास्टर माईंडचा तपास पोलिसांना घेता आला नाही. आरोपी मोकाट असून तपास कामात होत असलेली दिरंगाई यामुळे संपूर्ण समाजामध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. स्वर्गीय संतोष देशमुखांचे मारेकरी तातडीने अटक करून फाशीच्या शिक्षा करा या मागणीसाठी सर्वपक्षीय महा निषेध मोर्चा आयोजित केला असून जिल्ह्यातील दहशतवाद निपटून काढण्यासाठी जिल्हाभरातून लाखोच्या संख्येने लोक मोर्चात सहभागी होतील. या अन्यायाच्या विरोधातील लढ्यात प्रचंड संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी नाळवंडी जिप गटातील लोकांची बैठक श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आयोजित केली होती. या बैठकीस दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी आवाहन केले आहे.आ.संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार नेते राजेंद्र मस्के,शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख गणेश वरेकर परमेश्वर सातपुते, आदीसह पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.२८ डिसेंबर शनिवार रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून हा महानिषेध मूक मोर्चा निघणार आहे. सर्व जाती धर्मातील सर्व पक्षातील लोक न्यायासाठी या मोर्चात सहभागी होणार आहेत.

## कोणाचाही बाप येऊ द्या, देशमुख हत्या प्रकरण दाबू देणार नाही : जरांगे पाटील

### देशमुख कुटुंबियास न्याय मिळवून देणार

बीड । मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर या प्रकरणाची चर्चा चालू आहे. यातील काही आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत, परंतु अद्यापही प्रमुख आरोपीचा पोलिसांना तपास घेता येईना. या हत्यामागे मुख्य सूत्रधार सापडून त्यांना शिक्षा होईपर्यंत आपण पाठपुरावा करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. कोणाचाही बाप येऊ द्या मस्साजोग प्रकरण मी दबू देणार नाही, देशमुख कुटुंबियास न्याय मिळवून देणार असे सांगत २८ डिसेंबरच्या मोर्चात सहभागी होणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निघृणपणे हत्या करण्यात आलेली आहे. या हत्येच्या विरोधात अगदी पहिल्या दिवसापासून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आवाज उठविला आहे. या प्रकरणावर पुन्हा एकदा त्यांनी ताशेरे ओढले आहेत. येत्या २८ डिसेंबर बीडमधील मोर्चात स्वतः जरांगे पाटील सहभागी होणार आहेत. हे प्रकरण मी दबू देणार नाही, कोणाचाही बाप येऊ द्या, मी देशमुख कुटुंबियास जो पर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत मागे हटणार नाही, असे स्पष्टपणे बोलून दाखविले. कोण कसा तपास करतोय हे आम्हाला माहित नाही, मात्र आम्हाला संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय द्यायचा आहे. आज संपूर्ण बीड जिल्हा देशमुख कुटुंबियांच्या पाठिशी आहे. या प्रकरणात जर सरकार आणि प्रशासनाने हयगय केली तर बीडची जनता काय आहे हे आम्ही सरकारला दाखवून देऊ, आमच्या संयमाचा अंत पाहू नका असा इशाराही जरांगे पाटील यांनी बोलून दाखविला



## काळ्या बाजारात जाणाऱ्या शासकीय स्वस्त धान्यावर माजलगांव शहर पोलीसांचा छापा

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २५/१२/२०२४ रोजी माजलगांव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना गोपनिय बातम ीदाराने माहीती दिली की, माजलगांव येथील बायपास रोड लगचे साई लॉजच्या पाठीमागे एका पत्र्याच्या खाजगी गोडावुनमध्ये शासकीय स्वस्त धान्याचा माल काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी ठेवला आहे. अशी बातमी मिळाल्याने सदर माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी सदर ठिकाणी जावुन खाजगी गोडावुनवर मध्यरात्री छापा मारला असता तेथे अंदाजे ५० किलो वजनाचे गव्हाचे २०० पोते प्रति किलो ४०/- रुपये दराने ४,००,०००/- रुपये तसेच ५० पोते तांदुळ प्रति किलो ६०/-रुपये दराने १,५०,०००/- रुपये असे एकुण ५,५०,०००/- रुपयाचा माल मिळुन आला सदर मालाबाबत
तेथे हजर असलला इसम शेख अम जद शेख इब्राहीम रा. आझादनगर



माजलगांव याचे मालकीचे असल्याचे समजले आहे. सदर घटनेबाबत पोलीसांनी तहसिलदार माजलगांव यांना माहीती देवुन पुरवठाअधिकारी यांच्या मार्फतीने सदरचे खाजगी गोडावुन सिल करण्यात आले. सदर प्रकरणामध्ये पुरवठा अधिकारी यांच्या तक्रारीवरुन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, कमलेश मिना, सहा. पोलीस अधीक्षक उपविभाग केज, अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक के. बी. माकणे, सफौ/मुंजाबा कुव्हारे, पोहवा/माधव तोटेवाड, पोलीस अंमलदार संतराम थापडे, सचिन मस्के यांनी केली आहे.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला तब्बल १५ दिवसांचा कालावधी संपवून मुख्य आरोपी अजूनही मोकाट

**बीड पोलिस आणि सीआयडीला सुद्धा फरार आरोपी सापडत नसल्याचे चित्र आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमध्ये आक्रोश सुरु असतानाच राज्यातही संतापाची लाट आहे.**

## सर्वाधिक आरोप होत असलेला वाल्मिक कराडचं काय झालं?

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला तब्बल १५ दिवसांचा कालावधी संपवून मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहेत. बीड पोलिस आणि सीआयडीला सुद्धा फरार आरोपी सापडत नसल्याचे चित्र आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमध्ये आक्रोश सुरु असतानाच राज्यातही संतापाची लाट आहे. खंडणी मारामारी आणि दहशत माजवण्याचे आरोप होत असलेल्या आणि देशमुख यांच्या निर्घृण हत्येमध्येही सर्वाधिक आरोप होत असलेला वाल्मिक कराडचं काय झालं? याबाबतही कोणतीच माहिती समोर आलेली नाही. वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे अत्यंत निकटवर्तीय मानला जातो. पवनचक्की दोन कोटींच्या खंडणी प्रकरणात वाल्मिक कराड आरोपी असून यामधील एक आरोपी विष्णू चाटेला अटक करण्यात आली असली, तरी वाल्मिक कराडपर्यंत पोलिस पोहोचलेले नाहीत. सुदर्शन घुले हा खंडणीमधील सुद्धा आरोपी आहे. विष्णू चाटेच्या अटकेतून कोणती माहिती समोर आली याबाबतही पोलिसांकडून कोणतीच स्पष्टता देण्यात आलेली नाही. संतोष देशमुख प्रकरणात सुदर्शन घुले, सुंधीर सांगळे आणि कृष्णा आंधळे प्रमुख आरोपी आहेत. मात्र, अजूनही फरार आरोपींचा थांगपत्ता बीड पोलिस आणि सीआयडीला लागलेला नाही. बीडचा बिहार झाल्याचा आरोप असताना पोलिसांनी आरोपींच्या शिताफीने मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी जनरेट्यातून होत असतानाच आरोपीच हाती लागत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. संतोष देशमुख प्रकरणात आतापर्यंत तिघांना अटक करण्यात आली आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन! दरम्यान, सामाजिक



कार्यकर्त्या अंजली दमानिय यांनी धनंजय त्यांनी ट्विट करत धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन असल्याचे म्हटले आहे. दमानिया यांनी तीन दिवसांपूर्वीच ट्विट केले होते. ट्विटमध्ये म्हटले आहे की, धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन! हे घ्या धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यातील आर्थिक सख्य किती आहे याचे धडधडीत पुरावे. कंपनी एकत्र, जमीन एकत्र जगमित्र शुगर्स चे ६ सातबारे मी डिजिटली डाउनलोड केले ३५५४ गुंठे जमीन (८८ एकर ३४ गुंठे) धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन ! हे घ्या धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यातील आर्थिक सख्य किती आहे याचे धडधडीत पुरावे. कंपनी एकत्र, जमीन एकत्र जगमित्र शुगर्स चे ६ सातबारे मी डिजिटली डाउनलोड केले ३५५४ गुंठे जमीन (८८ एकर ३४ गुंठे) ../ _() २३, २०२४

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २७ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## संपादकीय

## माती जपली नाही, तर

भारतात शेती हा अजूनही बहुतांश लोकांच्या उपजीविकेचा स्रोत आहे. १.७८ दशलक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये पसरलेल्या जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या कृषी प्रणालीचा आधार आहे. मातीची धूप होण्याची गंभीर समस्या धान्य उत्पादनावरच परिणाम करत नाही, तर हवामान बदलाच्या युगात अनेक समस्यांचे मूळ बनत आहे. त्यात प्रामुख्याने पर्यावरणीय असंतुलनाचा समावेश होतो. माती किंवा जमिनीच्या वर उपलब्ध असलेले सैल आणि मऊ घटक बियाणे अंकुरित करतात, मुळे फुटतात आणि झाडे आणि पिके वाढवतात ही आपल्या पृथ्वीवरील जीवनाची प्रातिनिधिक ओळख आहे. आजच्या युगात, आठ अब्ज लोकांसाठी अन्न उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी बिघडत चाललेल्या परिसंस्थेचा समतोल राखणे आवश्यक आहे. हवामान संकट मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी झाडे आणि पिके हा एक मजबूत सक्षमकर्ता आहे; परंतु आज निसर्गाचे अस्तित्व, स्थिर आणि जंगम आणि प्राण्यांसाठी पोषक माती गंभीर धोक्यात आहे. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप केवळ कृषी उत्पादन आणि अन्न सुरक्षेवर परिणाम करत नाही, तर हवामान बदलाची समस्या अधिक व्यापक आणि जटिल बनवत आहे. मातीचा ऱ्हास, उत्पादन क्षमतेत घट आणि आधुनिक कृषी पद्धतींमुळे या समस्येची व्याप्ती दिवसेंदिवस नवीन क्षेत्रांमध्ये पसरत आहे. ङ्गनॅशनल ब्यूरो ऑफ सॉईल सर्व्हेफ्नुसार, भारतातील सुमारे एक तृतीयांश माती म्हणजे सुमारे १२० दशलक्ष हेक्टर मातीची धूप झाली. तिचा एक महत्त्वपूर्ण भाग सागरी क्षारीकरणामुळे प्रभावित झाला आहे. भारतातील बहुतेक राज्ये मातीची धूप होण्यामुळे प्रभावित आहेत. पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप होत असूनही, तंत्रज्ञानावर आधारित शेतीमुळे अन्न उत्पादनात वाढ झाली आहे. भारत आता कृषी उत्पादनाचा दुसरा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहे; परंतु कुपोषण ही अजूनही एक गंभीर समस्या आहे. पुराच्या वेळी मोठ्या प्रमाणावर मातीची धूप आणि बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात जमिनीचा वापर, रासायनिक खतांच्या मोठ्या प्रमाणावर वापरामुळे क्षारता जमा होणे, वाढती आंलता आणि पाणी साचणे इत्यादींमुळे शेतीयोग्य जमिनीचा मोठा भाग नापीक होत आहे; परंतु मातीची अशीच झीज होत राहिल्यास, येत्या काही वर्षांमध्ये अन्न आयात करावे लागेल. जगातील केवळ २.४ टक्के भूभाग असलेला भारत जगाच्या १८ टक्के लोकसंख्येला अन्न पुरवतो. अनियंत्रित शेती व्यतिरिक्त, मातीची धूप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीच्या वापरात होणारा व्यापक बदल. त्यात अविवेकी जंगलतोडदेखील समाविष्ट आहे. यासोबतच जनावरांच्या संख्येच्या बाबतीतही भारत हा सर्वात मोठा देश आहे. जनावरे चरताना जमिनीच्या वरच्या वनस्पती थराचा ऱ्हास होतो. वनस्पती काढून टाकल्यामुळे मातीचा वरचा थर कमकुवत होतो आणि पाऊस तसेच वाऱ्यामुळे मातीची धूप होते. भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश आहे आणि दीड अब्ज लोकांच्या पोटापाण्यासाठी लागणारे धान्य उत्पादन करण्यासाठी कृषी व्यवस्थेवर सतत दबाव असतो. या सर्वांचा परिणाम संपूर्ण कृषी व्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या मातीवर होतो. सध्या शेतीमध्ये ९४ टक्के रासायनिक खतांचा वापर केला जातो. रासायनिक कीटकनाशके आणि खतांच्या अतिवापरानेही शेतात आणि पिकांना विषबाधा झाली. भारत हा कीटकनाशकांचा सर्वात मोठा उत्पादक आणि वापरकर्तादेखील आहे. हरितक्रांतीच्या काळात आपले अन्नधान्य उत्पादन ५० दशलक्ष टनांवरून ३०० दशलक्ष टनांपर्यंत वाढले; परंतु हे यश सुपीक मातीची किंमत मोजून मिळालेले दिसते. अशा परिस्थितीत, जलद मातीचा नाश भारताच्या वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नसुरक्षेचे गंभीर संकट निर्माण करू शकते. मातीची धूप झाल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होतेच; पण नैसर्गिकरीत्या जमिनीत असलेल्या कार्बनचे प्रमाण कमी झाल्यामुळे पाणी शोषून घेण्याची आणि धरून ठेवण्याची क्षमताही मोठ्या प्रमाणात कमी होते. परिणामी, पाऊस आणि इतर स्त्रोतांमधून पाण्याचे पुनर्भरणदेखील लक्षणीय प्रमाणात कमी होते. त्यामुळे भारतातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात कमी होते. कृषीआधारित अर्थव्यवस्था भारताचे जागतिक आर्थिक चढ– उतारांपासून संरक्षण करते, म्हणूनच गेल्या काही दशकांमध्ये आलेल्या मोठ्या जागतिक मंदीच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम न होता वेगाने वाढ होत राहिली. एकूणच, असे म्हणता येईल की मातीची धूप ङ्गडोमिनो इफेक्टफ आहे. त्यामुळे नैसर्गिक, सामाजिक आणि आर्थिक प्रक्रियांवर नकारात्मक परिणाम होतो. हे स्पष्ट आहे की आजच्या काळात माती हे सर्वात महत्त्वाचे संसाधन आहे. भारतासारख्या देशासाठी ती केवळ पोट भरण्यासाठी आवश्यक नाही,

# अधिकारी , कर्मचा-यांनी सेवा पुस्तके अद्ययावत करून घ्यावीत - तहसिलदार चंद्रकांत शेळके

. तहसिल कार्यालय बीड येथील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी आपली सेवापुस्तके अद्ययावत करून घ्यावीत , यास्तव तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी कॅम्पचे आयोजन केले आहे . मंगळवार २४ डिसेंबर रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कॅम्पच्या ठिकाणी भेट देऊन काही सेवा पुस्तके तपासली व त्यावर सह्याही केल्या . यावेळी अधिकारी / कर्मचारी यांना मार्गदर्शन करत असताना त्यांनी नमूद केले की , शासनाने आपली नेमणूक जनतेच्या सेवेसाठी केलेली असून आपण सर्वांनी जनतेची कामे विहित वेळेत पार पाडली पाहिजेत . तथापि आपण सेवा करत असताना आपल्या सेवेचा आरसा म्हणजे आपले सेवापुस्तक सुव्यवस्थित करुन घ्यावे . वेळोवेळी निघालेल्या आदेशान्वये आपल्या जबाबदा–या , वेतनवाढ , वेतननिश्चिती , विशेष बाबी इ. सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने आवश्यक ते दस्ताऐवज उपलब्ध करून अद्ययावत करून घेण्याचे आवाहन केले . सेवापुस्तिका हे एक असे दस्तऐवज आहे की , ते सेवेत असताना , तसेच सेवानिवृत्ती नंतर पेन्शन साठी तसेच आपल्या पश्चात पती / पत्नीसाठी सुध्दा अद्यावत असणे अत्यंत आवश्यक आहे . सेवापुस्तक अद्ययावत असण्याचे महत्व हे सेवानिवृत्तीचा प्रस्ताव तयार करण्यावेळी प्रत्येकाच्या लक्षात येते व त्यावेळेस जुन्या काही नोंदी राहिल्या असतील व त्या नोंदी घेण्यासाठी दस्तऐवज उपलब्ध नसेल तर खूप अडचणी निर्माण होतात . त्यावेळी पेन्शन प्रकरणे लांबणीवर पडतात . यासाठी सेवापुस्तक अद्यावत करत असताना प्रत्येक कर्मचा–यांनी सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात आलेल्या प्रत्येक नोंदीच्या दस्तऐवजाची एक संचिकाही तयार करून ठेवण्याचे या प्रसंगी सूचित केले . तसेच वेळोवेळी ज्या त्या अधिका–यांच्या काळामध्येच सर्व सेवापुस्तके अद्यावत असावे अशी अपेक्षा व्यक्त केली . कोणत्याही नोंदी प्रलंबित नसाव्यात असाही निर्धार त्यांनी व्यक्त केला .

प्रलंबित असणा–या सेवापुस्तिका अद्ययावत करणेकामी बीड तालुक्यासाठी नियोजित कालबध्द कार्यक्रम १६ डिसेंबर २०२४ ते १० जानेवारी २०२५ पर्यंत आयोजित आहे . मंडळ अधिकारी , मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी , तसेच कार्यालयातील सर्व अधिकारी , कर्मचारी यांचेसाठी हा कॅम्प असून मुळ सेवा पुस्तक तपासणीसूची नुसार



तपासणी करून आवश्यक दस्तऐवजाची पूर्तता व्यक्तीश: कार्यालयात उपस्थित राहुन सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी तात्काळ करावी म्हणजे सर्वांच्या सेवापुस्तिका अद्यावत करणे सोईचे होईल असे आवाहन नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे .

सेवापुस्तक अद्यावतीकरणाचा कार्यक्रम हा कालबद्ध असल्याने विहित वेळेत पाडण्यासाठी नायब तहसीलदार सुहास हजारे यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे . तसेच अव्वल कारकून महादेव चौरे , राहुल कसबे , हेमलता परचाके , क्रांती इंगळे , वामन तोगरगे यांची पथक प्रमुख म्हणून तर महसूल सहायक अमोल डोंगरे , भरत भंडाणे , गंगाधर जवरे , वैशाली बहीरवाळ , स्वागत कांबळे व सुधाकर नागरगोजे यांची सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे . या काळात अंदाजे १०० सेवापुस्तके अद्ययावत होतील असा अंदाज अव्वल कारकून महादेव चौरे यांनी व्यक्त केला आहे .

काय असते सेवापट किंवा सेवापुस्तक : शासकीय सेवेत आल्यावर प्रत्येक अधिकारी , कर्मचारी यांचे सेवापुस्तक बनते . सेवापुस्तक हे प्रामुख्याने पाच उपविभागात विभागले जाते.
१) पहिले पान २) नियुक्ती तपशिल ३ ) रजेचा हिशोब ४ ) सेवेशी प्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या घटनांचा तपशील व ५ ) सेवा पडताळणी
पहिल्या पानावर प्रामुख्याने पुढीलप्रमाणे नोंदी घ्यावयाच्या असतात . १ ) जन्म तारखेची नोंद – जन्म तारखेची नोंद घेताना तिची कशाच्या आधारे पडताळणी केली (उदा इ. १० वी सनद ) त्याचा उल्लेख असतो . जन्म तारीख अंकी व अक्षरी लिहून कार्यालय प्रमुखांनी स्वाक्षरी करावी २ ) जात व धर्म लिहिताना मूळ जात लिहावी तसेच ज्या प्रवर्गातून अधिकारी कर्मचारी सेवेत लागले , त्याचाही उल्लेख करावा ३ ) सेवेत प्रवेश करत असताना शैक्षणिक पात्रतेच्या नोंदी सेवा पुस्तकात घेऊन त्यात वाढ झाल्यास त्या प्रमाणपत्राच्या उल्लेखासह त्या नोंदी साक्षांकित कराव्यात ४ ) वडीलांचे नाव व मूळ राहण्याचे ठिकाण नमूद करावे ५ ) मेडिकल सर्टिफिकेट अर्थात वैद्यकीय प्रमाणपत्राची नोंद घ्यावी . त्यानंतर सेवापुस्तकात प्रथम नियुक्ती आदेश , प्रथम रुजू दिनांक , प्रथम नियुक्ती स्थायी / अस्थायी बाबतची नोंद व नियुक्तीचा प्रवर्ग , नियुक्ती पदनाम व वेतनश्रेणी , स्वग्राम घोषणा पत्राची नोंद ,
गट विमा योजना सदस्य नोंद , चारित्र्य पडताळणी , छोटे कुटुंब प्रमाणपत्र , वार्षिक वेतनवाढ इत्यादी नोंदी घेतल्या जातात .

याशिवाय अधिकारी , कर्मचारी यांना विविध नामनिर्देशने भरावी लागतात . ज्यात गटविमा योजना , भविष्य निर्वाह निधी , अपघात विमा योजना इत्यादी नामनिर्देशनांचा समावेश होतो .
सेवा निवृतीनंतर शासकीय सेवेतून कार्यमुक्त केल्याची नोंद , अंतिम सेवानिवृत्ती वेतन , निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण , रजा रोखीकरण इत्यादी नोंदी घ्याव्या लागतात .

महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ मधील नियम ४५ नुसार सेवापुस्तकाची वार्षिक पडताळणी करणे आवश्यक आहे . प्रत्येक वर्षाच्या मे महिन्यामध्ये कार्यालय प्रमुखाने वार्षिक पडताळणी करावी .

सर्वसामान्य जनतेच्या अडचणी सोडवितानाच कार्यालयातील अधिकारी , कर्मचारी यांच्या वैयक्तिक अडचणी तहसीलदार शेळके यांनी जाणून घेतल्या . त्यांच्या लक्षात आले की काही अधिकारी , कर्मचारी यांची सेवा पुस्तके अद्ययावत नाहीत . त्यांनी तात्काळ कॅम्पचे आयोजन केले . यातून कर्मचा–यांप्रती त्यांची कर्तव्यभावना दिसून येते . अशा प्रकारे सर्व कार्यालय प्रमुख अधिकारी यांनी कर्मचा–यांप्रती अशी भावना ठेवल्यास कर्मचा–यांमध्येही उत्साह संचारतो आणि आपसुकच जनतेची कामेही मार्गी लागतात .

# केतुरा गावामध्ये दावल मलिक यात्रेमध्ये जंगी कुस्त्याचा फड संपन्न

दरवर्षी प्रमाणे केतुरा गावची यात्रा झाली उत्साहात साजरी महिला मल्लांनी ही गाजवला आखाडा गावची जत्रा ही गावच्या प्रत्येक व्यक्तीसाठी उत्सुकतेचा व आनंदाचा विषय असून ; सामाजिक बांधिलकी जपणारे आपले गाव , दावल मालिक यात्रेत दर वर्षी मग्न होऊन एकीने सहभागी होते . संदल ची मिरवणुक झाली की , दुसऱ्या दिवशी सुरू होतो कुस्त्यांचा माहोल . गावात वाजत–गाजत मिरवणुक निघते देवाच्या चरणी नारळ फोडून उत्साहात सुरुवात होते . संपूर्ण गाव जमा होतो . सालाबादप्रमाणे या ही वर्षी कुस्त्याच्या आखाड्यामधे, पंचक्रोशीतील आणि महाराष्ट्रातील नामवंत मल्लाची उपस्थिती कार्यक्रमात होती . विशेष म्हणजे मकेतुराफ गावच्या इतिहासातील पहिलीच यात्रा अशी झाली , की त्यामध्ये संभाजीनगर आणि राजस्थान मधील महिला मल्लांनी आपला मैदानी खेळ दाखवला दरवर्षी प्रमाणे गावकऱ्यांनी स्वखुशीने जमा केलेल्या बक्षीसा व्यतिरिक्त केतुरा गावचे आदर्श सरपंच परमेश्वर (नाना) तळेकर यांच्या हस्ते स्वःखर्चातून ६५ हजार रुपयांचे मल्लांना बक्षीस वितरण करण्यात आले . केतुरा गावचे सरपंच परमेश्वर नाना तळेकर उपसरपंच वसंत शिरसाट चेअरमन रामनाथ रहाडे , व्हाईस चेअरमन बाबासाहेब सिरसट , गजेंद्र बेद्रे , महादेव तळेकर , नवनाथ वांढरे ,शिवाजी ढगे , श्रीराम शिरसाट, नारायण शिंदे , दिलीप वांढरे, बाबासाहेब शिंदे, रामदास वांढरे ,सदाशिव घाडगे सर, उत्तमराव राहडे सर ,जनार्दन तळेकर राधाकिसन माने , घाडगे नंदकुमार घार्गे, कल्याण राहाडे, ग्रामपंचायत सदस्य श्रीधर गायकवाड व सोमीनाथ वांढरे सुदर्शन घाडगे , विलास भुसारी, अशोक शिंदे एकनाथ शिरसाट अश्रुबा खेडकर भिवसन निळकंठ इलिंद ससाने व सर्व गावातील तरुण मंडळ यांनी जंगी कुस्त्या चा कार्यक्रम आनंदात पार पडला. माणसा ची शरीर संपत्ती हीच खरी संपत्ती आहे शरीराला मेहनत व व्यायाम याची सवय लागणे गरजेचे आहे यामुळे आरोग्य चांगले राहते व निरोगी राहते तरुणांनी या दिशेकडे वाटचाल करावी व व्यायामाचा फायदा पोलीस भरती असो आर्मी भरती असो यामध्ये अतिशय फायदा होतो बीड ग्रामीणचे पोलीस कर्मचारी दुबाले साहेब व सानप साहेब यांनी महत्त्वाची जिम्मेदारी निभावली व त्यातून पैलवान विक्रमराव काशीद यांनी वस्तादचं काम निभावल शेवटची कुस्ती बाळु पैलवान व शकील पैलवान यांची झाली,
म्हणूनच आंबेडकर म्हणजे केवळ व्यक्ती नव्हे,तर एका युगाचं नाव आहे,जे प्रत्येक अन्यायग्रस्ताला त्याच्या स्वाभिमानाची आठवण करून देते. भारत हा कृषिप्रधान देश होता. त्यामुळेच एक घोषणा केली जात होती जय जवान जय किसान पूर्वी सरकार आणि समाज असा थेट सामना असे.शेपन्न इंच छाती असणारे आदरणीय नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर सरकार आणि समाज यांच्यामध्ये देशभक्त व अंधभक्त नावाची एक विचित्र अशी स्वयंघोषित फौज उभी झाली आणि ती सरकारची बाजू घेऊन आंदोलनजीवी विरोधात पोलिसा अगोदर लढण्यास सज्ज असते.

# शिक्षणाचा बाजार, पालक हैराण मुले बेजार

पाहिल्या भागाची शिक्षण क्षेत्रातील बातमी वाचून मला अनेक पालक, विध्यार्थी आणि शिक्षक असे लोकांचे फोन आले, तर काहींनी ीस केले कि हि बातमी वाचताना आम्हला वाटले कि हे विचार आमचेच आहेत. या भावना आमच्याच आहेत. हा त्रास आमचाच आहे. धन्यवाद वाचकांहो.
यावर मला एकच म्हणायचे आहे कि हा त्रास तुम्हला तुमचा वाटला तर या त्रासाला इतक्या वर्षात आवाज का उठवला नाही. कदाचित तुमची आणि विध्यार्थ्यांची गळचेपी जरा कमी झाली असती.बर याला क्लासेस वाले एकटे जबाबदार आहेत का तर नाही पाहिले तुम्ही जबाबदार आहात. आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून काही शाळेत तुम्ही वारेमाप फिस भरून ऍडमिशन मिळवता ते हि चुकीच्या पद्धतीने कधी जास्त पैसे देऊन, कधी लाच देऊन तर कधी अनेक मोठया हस्ती ला शब्द द्याला सांगून आणि कोणत्या हि परिस्थितीत ऍडमिशन करतात अश्या प्रकारे खरी सुरवात तुमच्या पासून होते. हजारो रुपये, काही शाळेत तर लाख रुपयावर डोनेशन देऊन ऍडमिशन घेतले जाते. इतक्या महागड्या शाळेत टाकण्या साठी पालकांची तर परीक्षाचं असते. पण जोपर्यंत अश्या महागड्या शाळेला पालक मिळतात तोपर्यंत या शाळा राहणार. एकदा काय त्या शाळेत ऍडमिशन मिळाले कि मग या शाळेचे खरे खरे नाटकं सुरु होतात आणि हे सर्व तुम्ही पालकं तर पुरवत असतात. शाळे वाल्यांना तर वाटतंच असते कि मासा एकदा गळी लागला तो काही सुटत नाही. मग त्यातूनच त्यांच्या मागण्या सुरु होतात. बर या मागण्याचा आणि शिक्षणाचा काही एक संबंध नसतो. या मागण्या तून खरेतर त्याच्याचं बढाया आणि
रेप्युटेशन वाढवायचं असते ते हि तुमच्या जीवावर.मुलांचे ड्रेस असे पाहिजे. दप्तरं असेच पाहिजे. आठवड्याचे तीन दिवस वेगळे सॉक्स आणि शूज बाकीचे तीन दिवस वेगळे इथपासून जे चालू होते ते कुठपर्यंत संपेल हे ठाऊक नाही. वह्या–पुस्तके,शाळेचा गणवेश,इतर शालेय वस्तू अबब हि लिस्ट असते कि किराणा मालाची यादी असते हेच कळत नाही. हि यादी पुरविण्याचे काम तुम्ही लोक म्हणजे पालक करीत असतो. तुम्ही तुमचे मुले घडविण्या साठी पाठवता कि कारखान्यातून जसा एखादा कामगार असतो तो कामगार होण्यासाठी कश्या साठी पाठवता?



रुपाली देशपांडे
मो.८८८८९५५५३९

इतक्या मागण्या पूर्ण केल्या तर आपले पालक खूप श्रीमंत आहेत आणि त्यांच्या कडे भरपूर पैसे आहेत ते पाहिजे ते सर्व देतात अश्या प्रकारचे मत मुलांचे तयार होते. पालकांहो तुम्ही सर्वसामान्य आहात.मुलाच्या शिक्षणासाठी तुम्ही अनेक तडजोडी करता हे तुमच्या मुलांना कधी कळणारच नाही त्याची मागणी वरेचवर वाढत जाणार पण त्यांना आयुष्यात काही आर्थिक तडजोडी असतात ह्या अनेक आर्थिक गोष्टी माहीतच होणार नाही. या शिक्षणाचा उपयोग काय. या मुलांना अश्याच तखझ जगण्याची सवय होते आणि त्याच्या पुढील आयुष्यात त्या व्ही. आय. पी जगण्यासाठी आयुष्य खूप खर्ची करावे लागते हि बाबच माहित नसेल तर हि मुले नैराश्याचे शिकार होतात आणि जगणे काय हे कळतच हेच विसरतात
पालकांनो तुम्ही नक्की तुमच्या मुलांना चांगले उच्च शिक्षण दया. पण त्या शिक्षणाच्या नावाखाली शाळेच्या अनेक निर्थक मागण्या पुरवू नका.
दुसरी महत्वाची बाब म्हणजे कि या महागड्या शाळेत पाठवून हि परत अश्याच शिक्षकांकडे क्लासेस लावता मग आता सांगा तुमचं तुम्हाला तरी कळते का कि तुम्ही कोठे चालला आहात. मुलांना शिक्षण दयाच कि एक शिकलेला गाढव तयार करायचा आहे.बर तुमचा बडेजावपणा शाळेपूरता संपत नाही तर तो प्रायव्हेट क्लास लावताना पण दिसतो. तुमच्या महागड्या शाळा उच्च प्रतीचे शिक्षण देऊ शकत नाही तर तुम्ही पालक म्हणून चुकत आहात कि नेमकी तुम्हला काय हवे आहे याची अक्कल तुम्हला नाही. या शाळेत उच्चप्रतीचे शिक्षण देऊ शकत नाही ती शाळा एक उत्तम माणूस कसा घडवेल. या शाळा आणि क्लास च्या राड्यात तुम्ही मात्र पालकशून्य झालात असे म्हणायला काही हारकत नाही.जो पर्यत तुमच्या सारखे पालक आहेत तो पर्यंत या अश्या शाळेची कमी नाही. राजकीय नेत्यांची आणि राजकीय हस्तक्षेप असलेल्या
शाळा/कॉलेज हे राजकीय लोक तर अश्या प्रमाणात काढतात कि जसे बाजारातील दुकाने उघडल्या सारखी शाळा, कॉलेज उघडतात. शैक्षणिक मूल्ये, शैक्षणिक तत्वे यांच्याशी संबंध हि नसतो. पण आपली राजकीय कारकिर्दी संपली तर शाळा, कॉलेज आपल्या नावाची असणे कधीही हिताचेच म्हणून हि देशभरात राबवलेली हि मोहीम आहे. सरकारी शाळा बंद करण्या मागचे हेच कारण. आता फक्त नावाला उरलेली सरकारी शाळा शिल्लक आहेत. ते हि कदाचित काही वर्षात बंद पाडून तिथेही हि शाळारुपी दुकाने उघडण्याची शक्यता आहे.
शैक्षणिक क्षेत्रात तरी राजकीय ढवळाढवळं नको होती कारण याने शैक्षणिक दर्जाच सर्व खालवला. शिक्षणा सोबत काही आयुष्याची मूल्ये शिक्षण असतात. या मूल्ये शिक्षणाशी यांच्याशी ओळख झालेली असते का?
भरपूर शिक्षण म्हणजेच मूल्य शिक्षण का असा एक प्रश्नच आहे.
उर्वरित भाग पुढील सदरात.
संपर्क – ८८८८९५५५३९

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २७ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# लोकसंस्कृतीचा आविष्कार माळेगाव यात्रा !

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा म्हणून ओळखली जाणारी माळेगाव यात्रा लोहा तालुक्यातील माळेगाव येथे दरवर्षी मार्गशिष महिन्यात भरते. यावर्षी ही यात्रा रविवार २९ डिसेंबर ते २ जानेवारी २०२५ या पाच दिवसाच्या कालावधीत भरणार आहे. गेल्या काही वर्षात नांदेड व लातूर जिल्हा प्रशासनाने यामध्ये आपला सहभाग वाढवला आहे. नांदेड जिल्हा परिषद, लोहा पंचायत समिती आणि माळेगाव ग्रामपंचायत या यात्रेचे आयोजन करते. महाराष्ट्र ाची वैभवसंपन्न परंपरा जपणारी व मराठवाडयाचे ऐतिहासिक महत्व जतन करणारी श्रीक्षेत्र खंडोबारायाची ही यात्रा नांदेड ते लातूर महाम ार्गावरील माळेगाव या गावी भरते. माळेगाव येथे मुख्य मंदिरात खंडोबा आणि म्हाळसा यांचे चांदीचे मुखवटे आहेत. हजारो वर्षापूर्वीच्या हेमाडपंथी मंदिरातील महादेवाचे रुप म्हणजे खंडोबा याठिकाणी दर्शनासाठी विराजमान आहेत. लाकडी देवघर चांदीच्या पत्र्याने मढविलेले आहे. श्रीक्षेत्र माळेगाव येथील नागरिकांचे ग्रामदैवत मल्हारी म्हाळसाकांत खंडोबा असून अनेक जणांचे खंडोबा हे कुलदैवतही आहे. या यात्रेच्या निमित्ताने देशाभरातून विविध भागातून सर्व जातीधर्माचे लोक येथे येतात.

याठिकाणी सांस्कृतिक ऐक्याचे, एकात्मतेने नटलेल्या विविधतेचे दर्शन पाहावयास मिळते. याठिकाणी मोठे-मोठे आकाश पाळणे सर्वांचे आकर्षण असून अनेक हौशी यात्रेकरु याचा आनंद घेतात. याठिकाणी जिल्हा परिषदेच्यावतीने विविध माहिती प्रदर्शने, कृषी प्रदर्शने, आरोग्य शिबिर, खाद्य पदार्थाचे म होत्सव भरविले जातात. या यात्रेला शेकडो वर्षांची परंपरा असल्याने येथील विविध शर्यती, प्रदर्शन, कुस्त्यांची दंगल, लोककला, संगीत वाद्य, लोकनाटक असा समृद्ध मराठी लोककला संस्कृतीचा अविष्कार पाहायला मिळतो. यात्रा ही जवळपास एक महिनाभर चालते. यात इथला जनावराचा बाजार हा सर्वदूर ओळखला जातो. यात घोडे, उंट, गाय, बैल, म्हैस, रेडे, गाढव, शेळया, मेंढया, कुत्रे आदी पशु पक्षी इतर राज्यातूनही लोक घेवून येतात. मागील तीन ते चार वर्षापासून म ाळेगाव यात्रेत श्वानांची खरेदी विक्रीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आपल्या नांदेडच्या भागात आणि लातूर जिल्ह्यात आढळणारा कारवान आणि पश्मी जातीच्या श्वानाची पसंती वाढली आहे. त्याचबरोबर लाब्राडोर, डोबरमन आणि जर्मन शेफर्ड जातीच्या श्वानांना पण मोठया प्रमाणात पसंती दिली जात आहे.

यावर्षी २९ डिसेंबर ते २ जानेवारी २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत माळेगाव यात्रा भरणार असून २९ डिसेंबर रोजी यात्रेच्या पहिल्या दिवशी देवस्वारी व पालखी पूजन, महिला व बालकांसाठी स्पर्धा, भव्य कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन व कृषिनिष्ठ शेतक-ंचा सत्कार जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येणार आहे. दुस-या दिवशी अश्व, श्वान, कुकूट प्रदर्शन व विविध स्पर्धाचे उदघाटन व महिला आरोग्य शिबिर होणार आहे. तीस-या दिवशी कुस्त्यांची दंगल, चौथ्या दिवशी शंकरपट बैल गाडा शर्यत, पारंपारिक लोककला म होत्सव, २ जानेवारी पाचव्या दिवशी सकाळी ११ वाजता पशुसंवर्धन विभागाचे बक्षिस वितरण, दुपारी ३ वाजता लावणी महोत्सव असे सर्व कार्यक्रमाचे जिल्हा परिषदेकडून नियोजन करण्यात आलेले आहे. स्थानिक परंपरेनुसार मल्लांना आणि लोककलेला प्रोत्साहन देण्यासाठी कला व लावणी महोत्सव आणि कुस्त्यांच्या दंगली, शंकरपट आयोजित केले जातात. कुस्त्यांच्या आखाडयातील फड जिंकणा-या म ल्लास रोख बक्षिसाबरोबर सन्मानाचा फेटा बांधून गौरविण्यात येते.

या यात्रेचे नियोजन दरवर्षी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येते. याही वर्षी यात्रेचे उत्तम नियोजन केले असून यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे. सर्व विभागांना करावयाच्या उपाययोजनेबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक विभागाने आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण केली असून यात्रा उत्तमरित्या पार पाडण्यासाठी सुयोग्य नियोजन केले आहे.

## जी-चॅम्प नॅशनल लेवल अबॅकस स्पर्धेत निक कोचींग क्लासेस, बीडचा अभयराज जाधव फर्स्ट रॅंक ट्रॉफीने सन्मानित




पुणे प्रतिनिधी.जी-चॅम्प अबॅकस संचलित गणेश काळे क्रिडांगण मंच, स्वारगेट, पुणे या ठिकाणी १५ डिसेंबर २०२४ रोजी जी-चॅम्प नॅशनल लेवल स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेत सुमारे ५००० विद्यार्थ्यांचा सहभाग झालेला होता. सौ. जया तिरगुळ, संचालिका, निक कोचिंग क्लासेस, स्वराज्य नगर, बीड येथील एकुण ४० विद्यार्थ्यांनी जी-चॅम्प नॅशनल लेवल स्पर्धेत सहभाग नोंदविला.

या प्रसंगी निक कोचिंग क्लासेसच्या यांच्या ४० विद्यार्थ्यांपैकी ०३ विद्यार्थ्यांना सुपरस्टार ट्रॉफी मिळाली यामध्ये चि. अभयराज अजितकुम ार जाधव (फर्स्ट रॅंक), चि. अंकितकुमार अजितकुमार जाधव (सेंकड रैंक) तर उर्वरित विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्यासह ट्रॉफी मिळण्याचा मान मिळाला. या यशाबद्दल निक कोचिंग क्लासेसच्या संचालिका सौ. जया तिरगुळ यांचे मोलाचे मार्गदर्शन ठरले तसेच विद्यार्थ्यांच्या व क्लासेसच्या यशामध्ये सौ जयश्री जाधव, सौ पल्लवी निकाळजे, कु. कुणीका फाटक यांचेही मार्गदर्शन मोलाचे ठरले. या स्पर्धेचे आयोजन पुणे येथे जी-चॅम्प अबॅकसचे डायरेक्टर श्री योगेश देशमाने व सौ आरती देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींकरीता कायदेशीर प्रशिक्षण शिबीरामध्ये मान्यवरांचे माहितीपुर्ण मार्गदर्शन

बीड दि. २६ : मानसिक आजारी व बौध्दिक व दिव्यांग व्यक्तींकरीता कायदेशीर प्रशिक्षण दोन दिवसीय शिबीर जिल्हा न्यायालयात झाले असून यात मान्यवरांचे माहिती पुर्ण मार्गदर्शन लाभले.सदर कार्यक्रमाचे उद्घाटक आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांनी केले. सदर कार्यक्रमास डॉ. मुजाहिद मोहम्मद जिल्हा शासकीय रूग्णालय बीड, जी.जी.सोनी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ॲड.पि.व्ही.दगडखैर मुख्य विधी सहायक संरक्षक लोकअभिरक्षक कार्यालय बीड, अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड, ॲड.ए.एस.कदम विधीसहाय संरक्षक, अधिकार मित्र तत्वशिल कांबळे, मिथुन जोगदंड, महेश कानपाठक, किरण नन्नवरे हे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण मुंबई, यांच्या सुचनेनुसार जिल्हयामध्ये मुलासांठी कायदेशीर मदत सेवा केंद्र प्रशिक्षण शिबीराचे आयोजन हे जिल्हा न्यायालयात दि. २३.१२.२०२४ व २४.१२.२०२४ या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा.जी.जी.सोनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले मनोन्याय या समितीबद्दल सविस्तर मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तीकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने मनोन्याय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमूळे मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींना न्याय मिळवणे सोपे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ॲड.पि.व्ही.दगडखैर यांनी मानसिक आरोग्याकरीता कायदेशीर सूविधा याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. ॲड. अमित कदम हे मार्गदर्शन करताना म्हणाले की,मानसिक आजार असलेल्या व्यक्तीचे हक्क आणि बौध्दिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या व्यक्ती करीता कायदेशीर मदत यावर सविस्तर मार्गदर्शन केले.डॉ. मुजाहिद मोहम्मद यांनी तज्ञ म्हणुन मार्गदर्शन करताना म्हणाले की, सध्याची तानतनावाची परिस्थिती व धावपळीचे जीवन यामध्ये मानसिक आजारी रूग्णांची संख्या वाढत असुन त्यावर तात्काळ उपचावर घेणे हे गरजेचे आहे. मानसिक आजार लपविल्यामूळे वाढतो. जर आपण वेळेवर उपचार घेतला तर, आपणास फायद्याचे ठरते. जिल्हा शासकीय रूग्णालय बीड येथे मानसिक रूग्ण यांचे उपचार केले जातात.तज्ञ डॉ. सुदाम मोगले यांनी आपला समाज व आपली सामाजिक परिस्थीती मानसिक आरोग्याच्या बाबतीत जागरूक नसल्यामूळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडत आहे. असे सांगत, प्रत्येक व्यक्तींनी मानसिक आरोग्याच्या बाबतीत सजग राहून त्यासंदर्भातील कायदे, मानसिक आरोग्याच्या सुविधा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने स्थापन झालेल्या मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तिकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने मनोन्याय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तरी आपल्या जिल्हयात यासंदर्भात काम सुरू झालेले असून याचा सर्वानी लाभ घ्यावा, अे आवाहन त्यांनी यावेळी केले.तत्वशील कांबळे यांनी मार्गदर्शन करत सांगितले, बालकांचे मानसिक आरोग्य जपणे खुप गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक बालक हा समान असुन त्यांचे शारीरीक व मानसिक आरोग्याची तपासणी गरजेनुसार करून घ्यावी.मिथुन जोगदंड यांनी विधीदुताचे (अधिकारमित्र) यांचे कार्यप्रणाली कशी असते याची सविस्तर माहिती दिली. मदतीसाठी टोल फ्री नंबर १५१०० कायदेशीर मदतीसाठी टोल फ्री नंबर सागितला टेलि मानस चे टोल फ्री क्रमांक १४४१६ ची माहिती दिली. अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती, बीड यांनी मनोरूग्ण व्यक्तीला सहानुभूतीपुर्वक हाताळले पाहीजे. मानसिक आजार याला जागतिक पातळीवर आजाराची मान्यता मिळाली आहे. त्यामूळे त्यावर ईलाज होऊ शकतो आणि मानसिक रूग्ण पुर्णपर्ण बरा होऊ शकतो. ही बाब लक्षात ठेवून मनोरूग्णाशी चांगल्या त-हेने वागले पाहिजे.या शिबीरात जिल्हयातील तालुका विधी सेवा प्राधिकरणातील विधीदुत उर्फ अधिकार मित्र हे बहुसंख्येने उपस्थित होते.

## पालकमंत्री बीडचाच हवा ; बाहेर जिल्ह्यातील पालकमंत्री अतुल सावे यांचा कार्यकाळात बीडकरांनी भोगलंय ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.२६ ) बीड जिल्ह्याला कायम अवकाळी पावसाचा तडाखा, गारपिटीने शेतक-्यांचे नुकसान तर संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात सर्वाधिक गेल्या १ जानेवारी २०२४ ते ३१ नोव्हेंबर २०२४ दरम्यान ११ महिन्यात १७४ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. सध्या बीड जिल्ह्याला पालकमंत्री बाहेरून मिळणार अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मि ळत आहेत. मात्र आम्हा बीडकरांचा मागील अनुभव पहाता जेव्हा मागच्या सरकारमध्ये बाहेर जिल्ह्यातील बीडचे पालकमंत्री अतुलजी सावे असताना आत्महत्याग्रस्त शेतक-यांना वा-यावर सोडले होते. त्याम ुळे आम्हाला दि.१० एप्रिल २०२३ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ङ ङ निष्क्रिय पालकमंत्री हटाव आंदोलन ङ करावे लागले होते. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितजी पवार यांनी बीड जिल्ह्यातील जनतेचा विचार करून बीडचा पालकमंत्री बीड जिल्ह्यातील असावा. बाहेरचा पालकमंत्री असल्यावर जिल्हा नियोजन समितीच्या बैठका वेळेवर होत नसुन निधी अभावी बीडचा विकास खुंटतो

बीड जिल्ह्यासाठीचा पालकमंत्री अजुनही जाहीर झाले नसल्याने जिल्हा नियोजन समितीची बैठक होऊ शकली नसल्याने शिल्लक निधी कसा खर्च करायचा आणि उर्वरित निधीची कशी मागणी करायची यावर शिक्कामोर्तब झालेले नाही.बीड जिल्ह्यासाठी

चालु आर्थिक वर्षात ४८४ कोटी रूपयांचा वार्षिक निधी मंजूर झाला खरा परंतु राज्य शासनाच्या नियोजन विभागाकडून केवळ १९० कोटी रुपये जिल्ह्याच्या पदरात आले.१९० कोटी रूपयांपैकी ३ म हिन्यात ११० कोटी रुपये खर्च झाले असुन त्यातील ७० कोटी रुपये शिल्लक आहेत.मंजुर असलेल्या एकुण ४८४ कोटी रूपयांपैकी अजूनही २९४ कोटी रुपये राज्य सरकारकडून बीड जिल्ह्याला मि ळालेले नाहीत. बाहेर जिल्ह्यातील पालकमंत्री असतील तर नियोजन समितीच्या बैठका वेळेवर होत नाहीत असा बीडकरांचा अनुभव आहे त्यामुळे बीडचाच पालकमंत्री करावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## सरपंच कै संतोष देशमुख यांच्या मारे-कऱ्यांचा मास्टरमाईड शोधून आरोपींना

### शनिवार दि २८ डिसेंबर २०२४ रोजी बीड येथे निघणाऱ्या सर्वपक्षीय मोर्चात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) सरपंच कै संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना व मस्टर माईड ला शोधून तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी बीड येथे निघणाऱ्या सर्वपक्षीय भव्य मोर्चात परळी शहर व तालुक्यातील नागरिकांनी म ोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे म हाराज यांनी केले आहे.




बीड जिल्ह्यातील मासाजोग येथे झालेल्या हत्याने सबंध भारत देशाला हादरून सोडले आहे. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना घडली असून या हत्याचे जे कोणी मास्टरमाइंड आहेत त्यांचा शोध घेऊन त्यांना तात्काळ अटक करावी व फाशीची शिक्षा देण्यात यावी. आज सरपंच कै संतोष देशमुख यांच्या हत्येला १७ दिवस उलटून गेले तरी यातील मास्टर माईड व मुख्य आरोपी अजूनही मोकाटच आहे यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये पोलीस प्रशासन व सरकारच्या विरोधामध्ये मोठ्या प्रमाणात रोष आहे या प्रकरणाचा लवकरात लवकर छडा लावून आरोपींना अटक करा तसेच सध्या बीड जिल्ह्यामध्ये छोट्या-मोठ्या अनेक घटना सातत्याने घडत आहेत यामुळे बीड जिल्ह्याम ध्ये मोठ्या प्रमाणात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून सर्वसाम ान्य जनता हवालदिल झाली आहे. पोलीस प्रशासन आणि सरकारने जातीने लक्ष घालून बीड जिल्ह्यामध्ये कायदा सुव्यवस्था प्रस्थापित करून चालू असलेली गुंडागर्दी दहशत मोडीत काढून खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यामध्ये शांतता नांदण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच मसाजोग येथे घडलेल्या घटनेच्या आरोपीला तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी कै संतोष देशम ुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा यासह विविध मागण्यासाठी शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी निघणाऱ्या सर्वपक्षीय मोर्चामध्ये परळी शहर व तालुक्यातील नागरिकांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केले आहे

## राज्यात २७-२८ डिसेंबरदरम्यान गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

### खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनीहवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

मुंबई, दि. २५ : २७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. २७ डिसेंबरला दुप-ारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यान-गर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंग-ोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्या-ची शक्यता देखील आहे. २८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी ला-वेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपे-क्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल.

२९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्या-तील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल, आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखा-ली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखा-ली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# देशमुख हत्या प्रकरणी आधी तपास फास्ट करा मग केस फास्टट्रॅक कोर्टात चालवा

## खा.बजरंग सोनवणे यांची मागणी, बीडमधील मोर्चात होणार सहभागी

केज: मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाला आता सोळा दिवस उलटले असून अद्याप काही आरोपींना अटक केलेली नाही. जे आरोपी खुनात आहेत, तेच आरोपी खंडणीत आहेत. या आरोपींचे सीडीआर काढावेत, यात पोलीसांचेही काय लागे-बांधे आहेत, हे नवीन एसपींनी तपासावे. आता काही पुढारी प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवा म्हणतात, परंतु हे करण्यासाठी आधी तपास फास्ट करा आणि प्रकरणाच्या खोलात जाऊन सर्व आरोपींना फाशी द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. दरम्यान, दि.२८ डिसेंबर रोजी बीड येथे होत असलेल्या मोर्चातही आपण सहभागी होत असल्याचे ते म्हणाले.

खा.बजरंग सोनवणे यांच्या पवनसुत या निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. दि.९ डिसेंबर रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली. त्याआधी पवनचक्की परिसरात गार्डला मारहाण केली म्हणून संतोष देशमुख सरपंच या नात्याने त्याठिकाणी गेले. परंतु हाच राग मनात धरून देशम ुख यांची निघृन हत्या केली. सदरील भांडणाच्या दिवशी कंपनीचा सुरक्षा गार्ड गुन्हा दाखल करायला गेला होता, परंतु त्याचा पोलीसांनी गुन्हा दाखल करून घेतला नाही. यावेळी पोलीसांना कोणाचा फोन आला. पोलीसांचे कोणासोबत लागेबांधे आहेत, याचा तपास झाला पाहिजे, यासाठी या प्रकरणाशी संबधितांचे कॉल डिटेल्स काढले पाहिजेत. साध्या प्रकरणात पोलीस आरोपी सापडत नसल्यास त्याच्या घरी जावून चौकशी करतात, सीडीआर काढतात. लोकसभा निवडणूकीत देखील याच पोलीसांनी सालगडी असल्यासारखे सत्ताधारी मंडळींचे काम केले.आमचे सीडीआर काढले, मग आता सीडीआर का काढले जात नाहीत. गुन्हा घडून सोळा दिसत झाले तरी आरोपीला अटक का केली जात नाही. पोलीसांनी दोन दिवसात आरोपींना अटक करू, असे म्हटले होते. परंतु शब्द देवूनही त्यांनी शब्द पाळला नाही. लोकांनी पोलीसांवर विश्वास ठेवला ही काय चुक आहे का. जिल्ह्यात सत्तेचा वापर करून कायदा व सुव्यस्था बिघडविण्याचे काम सुरू आहे. विधानसभा निवडणूकीत बंदुकीने हवेत गोळीबार करणा-या आरोपींनीच माधव जाधव यांना मारहाण केली. त्यावेळी असलेल्या पोलीस गार्डने गुन्हा का दाखल केला नाही. परळीतील यशवंत देशमुख यांच्यावर खोटा गुन्हा कोणी दाखल केला. पाटोद्याचे रामकृष्ण बांगर यांनी यांचे काय वाईट केले होते, त्यांचे घर उध्वस्त करण्याचे काम कोणी केले. यामुळे जिल्ह्यात गुन्हेगारीचा कळस झालेला असून देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था टिकविण्यासाठी पालकमंत्री चांगला असणे आवश्यक आहे. आता पालकमंत्री कोणाला करायचा हा त्या पक्षांचा प्रश्न आहे परंतु माझी इच्छा अजीत पवार यांनीच पालकमंत्री स्विकारावे, अशी आहे, असे म्हणत दि.२८ डिसेंबर रोजी आरोपींच्या अटकेसाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोर्चा काढण्यात येत आहे. या मोर्चात मी सहभागी होत असून जिल्ह्यातील नागरिकांनी ही आपली जबाबदारी आहे, या भावनेतून यावे, असे अवाहनही त्यांनी यावेळी केले.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २७ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# होळ ते आडस रस्त्यावर उसाच्या शेतात सापडले जिवंत अर्भक !

## अर्भकाची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.


**बीड,/प्रतिनिधी**

केज-तालुक्यातील होळ ते आडस रस्त्याच्या कडेला असलेल्या एका उसाच्या शेतात तीन महिन्याचे पुरुष जातीचे जिवंत अर्भक आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.२३ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ७ वाजता शेतात कामासाठी गेलेल्या एका शेतक-याला उसाच्या पाचटामध्ये काहीतरी हालचाल दिसून आली. अधिक जवळ जाऊन पाहिल्यानंतर काळ्या आणि लाल चौकटी असलेल्या रग पांघरलेल्या अवस्थेत एका तीन महिन्याच्या पुरुष जातीचे अर्भकाला आढळून आले. परिस्थिती गंभीर असल्याची जाणीव होताच त्यांनी लगेच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांना माहिती दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी पोलीस उपनिरीक्षक राहुल शेंडगे, पोलीस खेडकर, आणि महिला पोलिस गाडेकर यांना घटनास्थळी रवाना केले. पोलीस पथकाने घटनास्थळीवरून अर्भकाला ताब्यात घेतले आणि तातडीने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल केले. प्राथमिक तपासणीमध्ये अर्भकाची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



होळ येथील नागरिकांनीही या घटनेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेला कॉल करून घटनेची माहिती दिली. मात्र, या घटनेदरम्यान १०८ रुग्णवाहिका सेवेकडून अपेक्षित तत्परता दिसून आली नाही.१०८ रुग्णवाहिकेच्या सेवांवर प्रश्नचिन्ह घटनेच्या ठिकाणी १०८ रुग्णवाहिका पोहोचण्यासाठी जवळपास एक ते सव्वा तासाचा विलंब झाला. या विलंबामुळे नागरिकांमध्ये भीती युक्त नाराजी व्यक्त करण्यात आली. रुग्णवाहिका सेवेमध्ये असलेला हा हलगर्जीपणा गंभीर असून, कर्मचा-यांच्या मनमानी कारभारावर टीका होत आहे. नागरिकांनी असेही सांगितले की, १०८ सेवा गंभीर परिस्थितीतही तत्काळ प्रतिसाद देत नाही, ज्यामुळे अनेक वेळा वेळेवर मदत मिळवणे कठीण जाते. पोलीस प्रशासनाकडून सध्या या घटनेचा तपास सुरू आहे. अर्भक त्या ठिकाणी कसे पोहोचले, त्याला कोणी आणि का टाकले? याबाबत पोलीस विविध कोनातून चौकशी करत आहेत. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, त्या भागात असे प्रकार पूर्वी कधी घडले नाहीत, त्यामुळे या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे.सामाजिक भान आणि जबाबदारी....या घटनेने समाजातील संवेदनशीलतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आलाआहे. नवजात अर्भकाला असे शेतात सोडून जाण्याच्या घटनेने अनेक सामाजिक आणि मानसिक मुद्द्यांवर विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे. नागरिकांनी या घटनेवर संताप व्यक्त करत, समाजात या विरोधात जागृती निर्माण करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.घटनास्थळी सापडलेल्या या अर्भकाच्या प्रकृतीत सध्या सुधारणा आहे, आणि पोलीस पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे समाजातील असंवेदनशीलतेचा चेहरा समोर आला आहे.सामाजिक जबाबदारीची जाण ठेवून या प्रकारांना आळा घालणे गरजेचे आहे, ज्यामुळे निष्पाप जीवांना अशा भयानक परिस्थितीला सामोरे जावे लागणार नाही.

## मा.पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अमृतमहोत्सवीय अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त नांदेड येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष मा.पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अमृतमहोत्सवीय अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त २५-डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण मराठा मुलांचे वसतिगृह नवा मोंढा नांदेड येथे नियोजन बैठक संपन्न झाली.प्रारंभी जिजाऊ वंदनेने बैठकीची सुरुवात करण्यात आली. मा.पुरुषोत्तम खेडेकर यांचा ४- जानेवारी रोजी बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे अमृत महोत्सवीय अभिष्टचिंतन सोहळा संपन्न होणार असून त्यानिमित्त मराठा सेवा संघ व ३३ कक्षांच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावर आरोग्य शिबिरे वृक्षारोपण शैक्षणिक साहित्य वाटप अजीवन सभासद नोंदणी आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. त्याचबरोबर मराठा सेवा संघ मुलींच्या वस्तीगृहातील अभ्यासिकेमध्ये बारा तास अभ्यास हा उपक्रम ही यावेळी घेण्यात येणार आहे.नियोजन बैठकीवेळी मराठा सेवा संघाचे राज्य कार्याध्यक्ष प्रा.अर्जुनराव तनपुरे प्रदेश सहसचिव डॉ.पंजाबराव चव्हाण विभागीय अध्यक्ष शे रा पाटील माजी उपशिक्षणाधिकारी शिवाजीराव खुडे राष्ट्रीय अर्थकोष कक्षाचे अध्यक्ष डॉ.सोपानराव क्षिरसागर वसतीगृहाचे अध्यक्ष मधुकर मामा देशमुख विभागीय कार्याध्यक्ष इंजि व्हि टी शिंदे जिल्हाध्यक्ष (द) पंडितराव कदम जिल्हाध्यक्ष (उ) सतिशकुमार जाधव यांच्या सह मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्षांचे आजी-माजी पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# संतोष देशमुख माझाच बूथप्रमुख, एसआयटीची मागणी मीच केली-पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे



मुंबई (वृत्तसंस्था): सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण हत्या प्रकरणामध्ये एसआयटी नेमण्याची पहिल्यांदा मागणी मीच गोपीनाथगडावरून केली होती आणि या घटनेचा तीव्र संताप व्यक्त केला होता. सध्या मुख्यमंत्री आणि गृहमंत्री सुद्धा देवेंद्र फडणवीस आहेत आणि ते लेकराला नक्की न्याय देतील आणि त्यांच्या घरच्यांना सुद्धा न्याय देतील अशी प्रतिक्रिया पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिली. पंकजा मुंडे आज करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात दर्शनासाठी पोहोचल्या. यावेळी बोलताना त्यांनी संतोष देशमुख प्रकरणावर भाष्य केलं.ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की संतोष देशमुख हा माझाच बुथप्रमुख होता. या प्रकरणामध्ये पहिली एसआयटी नेमण्याची मागणी मी गोपीनाथ गडावरून केली होती.फडणवीस न्याय नक्की देतील, असेही त्या म्हणाल्या. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी पचगंगा नदी प्रदूषण मुक्तीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भूपेंद्र यादव यांची भेट घेणार असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले. मानवजातीसाठी पर्याय वाचवावा लागेल असेही त्यांनी सांगितले. पंकजा यांनी सांगितले की, ऊसतोड कामगारांची पोरं ऊस तोडायला जातात हे विदारक चित्र बदलण्याची गरज आहे. बारामतीमध्ये मुलाचा खून, पुण्यात मुळशी पॅटर्न अद्याप सुरू आहे कोयता गँग ॲक्टिव्ह आहे यामध्ये कोणतेही राजकारण न करता सामान्य माणसाला न्याय देता येईल अशी भूमिका आम्हाला घ्यायची असल्याचे असल्याचे त्यांनी सांगितले. मजूर आणि ऊसतोड कामगारांचे उद्धार करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असेही त्यांनी नमूद केले.

## त्यागमूर्ती माता रमाई जयंतीनिमित्त राष्ट्रशिक्षिका सावित्री माई फुले यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन

क्रांतीसुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त होत असलेल्या सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेत चारशे विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे अशी माहिती संस्थेचे विश्वस्त सदानंद प्रधान यांनी दिली आहे परीक्षत सहभागी विद्यार्थ्यांना सावित्री माई चा ग्रंथ परीक्षा पॅड व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत प्रथम येणा-या विद्यार्थ्यांस सात ७००० दुसरे पारितोषिक तिसरे पारितोषिक ३००० रु. हे देणार आहेत प्रोत्साहन प्रति ५०० रु प्रमाणे ६ बक्षीस देण्यात येणार आहेत विशेष सहकार्य सहकार्य : प्राचार्य मा. सानप साहेव, मा.प्रा. संजय बागुल, मा.के.व्ही. साळवे, मा. अभिमन्यु इविते, मा. राहुल टाकणखार, मा. चंद्रशेखर तौर, मा. रमेश वजीर, मा. नामदेव भगत, मा. वसंत टाकणखार, मा. कपिल डोंगरे, मा. लक्ष्मण पोटभरे, मा. प्रभाकर साळवे, मा. कैलास टाकणखार, मा.प्रा.डॉ.एम.एस. वानखेडे, मा.प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा.व्हि.एस. भिसे मॅडम, मा. प्रमोद साळवे, मा.वाय.बी.भोसले, मा.प्रा. राहुल कांबळे, मा. प्रशांत जाधव, मा. बळीराम कोरडे, मा. एकनाथ मस्के, मा. बाबासाहेब जाधव, मा.प्रा. धम्मानंद बोराडे, मा. संघर्षकुमार डोंगरे, मा. शांतीलाल पट्टेकर, मा. शिवाजी ससाणे, मा. संदीप वाघमारे, मा. सचिन कांबळे, मा. राजकुमार सोनपसारे, मा. अरविंद ओव्हाळ, मा. अमर साळवे, मा. समाधान आवेगावकर, मा. किसन भदर्गे, मा. नितीन गायसमुद्रे

आयोजक अशोक मगर, शत्रुघ्न कसवे, अश्विन टाकणखार, संदेश डोंगरे, दिनेश निसर्गंध, प्रविण ओव्हाळ, स्वप्नील स्वामी, संकेत लांडगे, सदानंदभैय्या प्रधान, आजिनाथ लोखंडे, केतन प्रधान, राज सोनवणे, संजोग कसबे, राहुल वाघमारे, डॉ. सुहास टाकणखार, दिपक टाकणखार, अभिजीत साळवे, संदेश निसर्गंध, सचिनदादा टाकणखार, संदेश लांडगे, रविकिरण टाकणखार, नवनाथ तोडके, नितीन मगर, विशाल टाकणखार, विजय साळवे, सचिन मगर, विलेश कांबळे, बळीराम माने, मुंजाजी तुपसमुद्रे, राज कुमावत, नंदकिशोर निसर्गध, रोहन टाकणखार, गब्बर ससाणे, सुहास टाकणखार, आरव जोगदंड, कपिल भाग्यवंत, ऋषीकेश सोनवणे, विशाल सोनपसारे, सुजल खळगे, दिपकदादा गायकवाड, सुबोध खळगे, रविराज भालेराव, प्रमोद भदर्गे, मिलिंद भाग्यवंत, बळीराम जाधव, सिद्धार्थ साळवे, राहुल धाईजे, मानव पोटभरे, शशिकांत घनघाव, अनिल भराटे, उत्कर्ष शिंदे, नवरत्न प्रधान, अविनाश गायकवाड, सचिन सिरसट, संघपाल साळवे, रमेश बल्लाळ, सुशिम बोराडे, बबलु फंदे, उत्कर्ष शिंदे

## आम आदमी पार्टीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष मा धनंजय शिंदे मोर्चात सहभागी होणार

### निषेध मोर्चामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे माजी सैनिक अशोक येडे जिल्हा अध्यक्ष आम आदमी पार्टी



बीड.. मसाजोग चे सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांची अमानुष प्रकारे हत्या करण्यात आली यांच्या हत्येच्या निषेधार्थ २८ डिसेंबर रोजी सर्वपक्षीय नागरिक यांच्याद्वारे काढण्यात येणा-्या निषेध मोर्चामध्ये आम आदमी पार्टीचे महाराष्ट्रातील नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत बीड जिल्ह्यातील ढासळलेली कानून व्यवस्था वाढलेला अपराध मर्डर किडनॅपिंग बलात्कार महिलांवर होणारा अत्याचार आणि अपराधी मोकाट फिरत असलेले या सर्व निषेध म्हणून काढण्यात येणा-्या मोर्चामध्ये आम आदमी पार्टी सर्व ताकतीनशे उतरणार आहे तरी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व सामान्य नागरिक यांनी जास्तीत जास्त संख्येने निषेध व्यक्त करण्यासाठी २८ डिसेंबर रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक सकाळी १०.३०वा. जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी च्या वतीने करण्यात येत आहे.

## संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी व सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यासाठी येत्या दिनांक २८ डिसेंबरला बीड येथे मोर्चात सर्व जनते ने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे नविदुद्दीन सिद्दिकी

.सरपंच संतोष देशमुख यांना व यांच्या सह ते पत्रकार युवा समाजसेवकांना जे धाडीसपणे भ्रष्टचार व अन्यायाचे विरोधात लिहितात व आवाज उठवतात असे समाजसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांना व पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना ऊर्जा व ताकद देण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणावर सामाजिक कार्यकर्त्यांची समाजामध्ये वाढ करण्यासाठी तसेच गुंड गर्दी ब्लॅकमेलिंग व भ्रष्टचार करणा-यांचा खात्मा करण्यासाठी व तसेच बीड जिल्ह्यात येणारे वेळात व काळात गुंड गर्दी व जंगल राज सारखा कुणीही वागू नये यामुळे सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी व बीड जिल्ह्याच्या भ्रष्टचार अन्यायाचे विरोधात जे आवाज उठवेल तर त्याची अशी सरपंच संतोष देशमुख सारखी अमानुषपणे खुलेआम किडनॅप करून हत्या केली जाईल तर आमचे सर्वसामान्य समाजसेवक पत्रकार कार्यकर्ते चा ही नंबर येऊ शकतो म्हणून हे जंगल राज गुंड गर्दी रोखण्यासाठी व संतोष देशमुख यांना न्याय मिळवण्यासाठी व बीड जिल्ह्यात गुंड लोकांवर धाक राखण्यासाठी ह्या सर्व गुन्ह्यागाराविरोधात व त्यांना सपोर्ट करणा-्या विरोधात येथे दिनांक २८ डिसेंबर रोजी सर्व पक्ष व सर्व संघटन व सर्व जातीचे धर्माचे जनताला माझा आव्हान है व विनंती आहे की येत्या २८ डिसेंबर रोजी बीड येथे होणारे मोर्चात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे आपलाच एक सामाजिक कार्यकर्ता नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव बीड




# मराठवाड्यामध्ये सोलर पॅनल दुरुस्ती व देखभाल प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून

## खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना उद्योग उभारण्याची संधी.

बीड दि. २६ :- महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील ङ्गअमृतङ्घ संस्थेच्या लक्षति गटातील उमेदवारांसाठी मोफत सोलर पॅनल इंस्टॉलेशन वर आधारीत निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम छत्रपती संभाजी नगर व लातूर येथे दोन बॅच मध्ये दिनांक ०७ /०१ /२०२५ ते २४/०१/२०२५ या अठरा दिवसाच्या कालावधीमध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**अशा प्रकारे असेल प्रशिक्षण**

सध्या ऊर्जेचा तुटवडा भासत असल्यामुळे शासनाचे धोरण सोलर ऊर्जा निर्मितीला प्राधान्य देण्याचे आहे. त्यामुळे सोलर ऊर्जा निर्मितीसाठी शासनाच्या वतीने सबसिडीच्या दरामध्ये शेतकरी तसेच लाभार्थ्यांना सोलर पॅनल देण्यात येत आहेत. परंतु सदरील पॅनल इन्स्टॉलेशन, मेंटेनन्स, दुरुस्ती करणारे मनुष्यबळ मराठवाड्यामध्ये कमी प्रमाणात उपलब्ध आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार व उद्योग करण्याची संधी या प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध होणार असून प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. तसेच मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे सदरील प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

**कोण कोण घेऊ शकणार प्रशिक्षण**

सदरील प्रशिक्षण हे खुल्या प्रवर्गातील अमृत लक्षित गटातील उमेदवारांसाठी म्हणजे (ब्राह्मण, बनिया, वत्स, कम्मा, कायस्त, नायर, एयांगर, पाटीदार, बंगाली, पटेल, मारवाडी, यलमार, त्यागी, ठाकूर, मारवाडी, सेनगुनथर, सिंधी, राजपुरोहित, नायडू,) इत्यादी प्रवर्गातील लाभार्थींना सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे सहभागी होता येईल. प्रवेशासाठी पात्रता शिक्षण किमान १२ वी पास, पदवीधर, तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असून वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष असून मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यातील उमेदवारांना प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.

**शैक्षणिक पात्रता आणि नियम**

शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाणपत्र/ गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, तहसीलचे अधिवास प्रमाणपत्र, जातीचा उल्लेख असलेल्या कोणत्याही शासकीय कागदपत्राचा पुरावा, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असल्याचे तहसील उत्पन्न दाखला, विवाहित असल्यास महिलांसाठी गॅझेट किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा पॅन कार्ड प्रवेश अर्ज सोबत झेरॉक्स प्रतिमध्ये जोडणे आवश्यक आहे. ु mahaamrut.org.in या वेबसाईटवर आपला अर्ज अपलोड करून, अर्जाची हार्ड कॉपी व अर्जासोबत आवश्यक कागदपत्राची झेरॉक्स प्रत जोडून संबंधित जिल्ह्यातील जिल्हा प्रकल्प अधिकारी द्वारा जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग भवन या ठिकाणी प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

प्रवेश अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये सादर करण्याची अंतिम दिनांक ०१/०१/२०२५ असून प्रवेश घेऊ इच्छिणा-या लाभार्थीसाठी दिनांक २३/ १२ /२०१४ रोजी एम सी ई डी जिल्हा कार्यालय येथे नि:शुल्क एकदिवसीय परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित सर्व जिल्ह्याच्या प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग भवन या ठिकाणी संपर्क साधावा व आपला प्रवेश अर्ज सादर करावा असे आवाहन श्री विजय जोशी व्यवस्थापकीय संचालक ङ्गअमृतङ्घ, पुणे, श्री बी. टी. यशवंते, कार्यकारी संचालक, एम सी ई डी तथा उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर, श्री सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com